# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक - १५६१/२०२१/नाशिक**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.सैय्यद अतिक सैय्यद याकुब,<br>रा.घर नंबर १३३, गल्ली नंबर ७,<br>बापु गांधी नगर, मालेगांव,<br>ता.मालेगांव, जि.नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा,<br>कनिष्ठ प्रशासन अधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक,<br>ता.जि.नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक,<br>ता.जि.नाशिक. | : | प्रतिवादी |

**ऑनलाईन सुनावणी दिनांक — २४/०३/२०२२**

अपिलार्थी यांनी दिनांक १७/०६/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यामध्ये दिनांक २४/०३/२०२२ रोजी meet.google.com/wne-oqrk-ffm या गुगल मिट कोडद्वारे आयोजित ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित होते. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते. तत्कालीन/विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचेतर्फे प्रतिनिधी उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक ०६/०४/२०२१ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पुरविली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केला नाही. त्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपील दाखल करावे लागले.

सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०६/०४/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये मा.मुंबई उच्च न्यायालय यांचे रिट पिटीशन (स्टॅम्प) नंबर ९७०६४/२०२० चे आदेश दिले असून सदरहु पिटीशन मध्ये पॅरा एफ मध्ये असे नमूद आहे की, एम ई पी एस रुल्स ३ (१) ते (५) यात नमूद नुसार संस्थेत वाद असल्यास ॲप्रोल थांबविण्याचे कोणतेही अधिकार आपले कार्यालयास नाही. तरी जमहूर हायस्कुल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज जमहूर नगर, मालेगांव जि.नाशिक चे बोगस पदाधिकारी यांचे

शेडयुल्ड वर नाव नाही तरी त्यांनी जे प्रस्ताव सादर केले त्यांना मान्यता देता येते याची माहिती मिळावी व त्याबाबतचा पुरावा मिळावा. त्यास अनुसरुन अपिलार्थीस दिनांक ०४/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, कोवीड-१९ असल्याने शासनाचे नियमानुसार कार्यालयातील उपस्थितीच्या आधारे कार्यक्षमता असल्याने सदरची माहिती देण्यास अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यास झालेल्या विलंबाबत दिलगिरी व्यक्त करतो. मागितलेली माहिती उपलब्ध नाही, असे कळविले. दरम्यानच्या कालावधीत अपिलार्थी यांनी दिनांक १०/०५/२०२१ अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीदरम्यान तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक १०/०५/२०२१ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२/१२/२०२१ रोजी निर्णय पारीत करुन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४/०८/२०२१ च्या पत्रान्वये माहिती पुरविली असल्याचे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढले.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता, अपिलार्थी यांच्या दिनांक ०६/०४/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस दिनांक ०४/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध नाही, असे कळविले आहे म्हणजेच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसून येत नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्राप्त प्रथम अपील अर्जावर विलंबाने सुनावणी घेतली. ही बाब माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(६) मधील नमुद तरतुदींचा भंग करणारी आहे. म्हणून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.केंमाअ-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दिनांक ३१/०३/२००८ नुसार कार्यवाही का प्रस्तावित करण्यात येऊ नये, याबाबत त्यांचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. अपिलार्थीस जन माहिती माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध नसल्याबाबत कळविले असल्याने पुन्हा माहिती पुरविण्याची आवश्यकता नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद नाशिक, श्री.शिवराम बोटे यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ०६/०४/२०२१ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन विहित मुदतीत माहिती पुरविली नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार

अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

२) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद नाशिक, श्रीमती वैशाली झनकर यांनी अपिलार्थी यांनी दिनांक १०/०५/२०२१ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर विहीत मुदतीत सुनावणी घेऊन निर्णय पारित केला नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दिनांक ३१/०३/२००८ नुसार कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शासन परिपत्रक दिनांक ३१/०३/२००८ नुसार कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) वरील निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक १५६१/२०२१/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, ता.जि.नाशिक.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२) श्री.शिवराम बोटे (तत्कालीन जन माहिती अधिकारी) कनिष्ठ प्रशासन अधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक, ता.जि.नाशिक.

३) श्रीमती वैशाली झनकर (तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, ता.जि.नाशिक.

---

क्र.रामाआ-नाशिक/द्वि.अ.क्र.१५६१/२०२१/नाशिक/जा-११३८ दिनांक- 30/06/2021